अति. महा. आयुक्त (ज) यांचे कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे–५.
जा.क्र. :– अतिमआ/साप्रवि/आस्था/२०७६
दिनांक :– ०८/०७/२०१६

## –: कार्यालयीन आदेश :–

विषय :– श्री. किशोर पोळ, अधिक्षक अभियंता (यांत्रिक) यांचे अर्जित रजा कालावधीत त्यांचे पदाचे कामकाज व्यवस्थेबाबत.

संदर्भ :– १) आवक क्र. आस्था/४३५६, दिनांक ०२/०७/२०१६.
२) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/२९०, दिनांक ०२/०७/२०१६.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अधिक्षक अभियंता (यांत्रिक) या पदावर कार्यरत असलेले श्री. किशोर पोळ, यांनी दिनांक ०४/०७/२०१६ ते दिनांक १६/०७/२०१६ अखेर १३ दिवस आर्थिक सहाय्य रजा व सदर रजेस जोडून दिनांक १७/०७/२०१६ ते दिनांक ३०/०७/२०१६ अखेर अर्जित रजा मिळणेस व मुख्यालय सोडणेस विनंती अर्ज केला आहे. त्यास मा. महापालिका आयुक्त यांनी संदर्भ क्र. २ चे ठरावान्वये मान्यता दिली आहे.

श्री. किशोर पोळ, अधिक्षक अभियंता (यांत्रिक) यांचे उपरोक्त रजा कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त पदभार श्री. सुरेश जगताप, सह महापालिका आयुक्त (परिमंडळ क्र. ४) तथा (घनकचरा विभाग), यांचेकडे सोपविणेत येत आहे.

श्री. सुरेश जगताप, सह महापालिका आयुक्त (परिमंडळ क्र. ४) तथा (घनकचरा विभाग), यांनी स्वत:च्या पदाचे कामकाज सांभाळून अधिक्षक अभियंता (यांत्रिक) या पदाचे संपुर्ण कामकाज उपरोक्त रजा कालावधीत करावयाचे आहे.

श्री. सुरेश जगताप, यांनी वरीलप्रमाणे अतिरिक्त पदभार स्विकृत केलेबाबतचे निवेदन आमचे कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजविज करावी.

(राजेंद्र जगताप)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका.

प्रत:– **सर्व संबंधित मा.खातेप्रमुख,**
पुणे महानगरपालिका.
यांजकडे माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना . . . .

(मंगेश जोशी)
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका.